# महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026



माहिती पुस्तिका

# शुभेच्छा



सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य नावीन्यपूर्ण उपक्रम, महत्त्वपूर्ण धोरणे, आवश्यक कायदे आणि क्रांतिकारी निर्णयांमध्ये देशात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. राज्याने घेतलेल्या अनेक निर्णयांचे आणि धोरणांचे देशभर अनुकरण झाले आहे. 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026' हा त्यापैकीच एक ऐतिहासिक आणि आदर्श कायदा असून, तो राज्याच्या कृषि विकासाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरेल.

शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचे योगदान अमूल्य असूनही त्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख आणि अधिकार मिळाले नव्हते. ही ऐतिहासिक उणीव दूर करून महिला शेतकऱ्यांना समान हक्क, सन्मान आणि संधी प्रदान करणारा हा कायदा कृषि क्षेत्राला नवी दिशा देणारा आहे.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत 2047 या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी विकसित महाराष्ट्र 2047 च्या दिशेने राज्य शासन शेती अधिक आधुनिक, तंत्रज्ञानाधारित, शाश्वत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. सिंचन, जलसंधारण, नैसर्गिक शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान, अचूक शेती, डिजिटल कृषि सेवा, कृषि प्रक्रिया उद्योग आणि जागतिक बाजारपेठांशी जोडणी यांसारख्या उपक्रमांद्वारे कृषि क्षेत्र अधिक सक्षम केले जात आहे.

या कायद्यामुळे महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख, शासनाच्या योजनांमध्ये थेट सहभाग, कर्ज, पीक विमा, अनुदाने, प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि बाजारपेठेपर्यंत अधिक सुलभ प्रवेश मिळेल. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळून कृषि क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधिक प्रभावी होईल.

या ऐतिहासिक कायद्यावर कृषि विभागाने तयार केलेले हे पुस्तक शेतकरी, संशोधक, धोरणकर्ते, विद्यार्थी आणि कृषि क्षेत्रातील सर्व घटकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास आहे. या पुस्तक प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा! यानिमित्ताने कृषि विभाग आणि महिला शेतकऱ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**—देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री

# शुभेच्छा



सत्यमेव जयते

राज्य शासनाने महिला शेतकऱ्यांच्या सन्मान, अधिकार आणि सर्वांगीण प्रगतीसाठी उचललेले 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026' हे पाऊल महाराष्ट्राच्या कृषि इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. याच विषयावर कृषि विभाग प्रकाशित करीत असलेले हे पुस्तक या परिवर्तनाच्या प्रवासाचे महत्त्वपूर्ण दस्तावेज ठरेल.

या पुस्तकातून कायद्यामागील उद्दिष्टे, महिला शेतकऱ्यांचे अधिकार, शासनाच्या विविध योजना, कृषि क्षेत्रातील बदलती दिशा आणि भविष्यातील संधी यांचे सर्वंकष विवेचन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, कृषि क्षेत्राच्या विकासासाठीची त्यांची स्पष्ट भूमिका आणि महिला सक्षमीकरणाबाबतची दृढ बांधिलकी या उपक्रमामागील प्रेरणादायी शक्ती आहे.

महाराष्ट्रातील शेतीव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यात महिला शेतकऱ्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. मात्र, प्रत्यक्षात शेतीची जबाबदारी सांभाळूनही त्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून आवश्यक ती ओळख आणि हक्क अनेक वर्षे मिळू शकले नव्हते. नव्या कायद्यामुळे ही दीर्घकालीन तफावत दूर होऊन महिलांना त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान आणि अधिकार प्राप्त होतील.

'विकसित महाराष्ट्र 2047' या ध्येयदृष्टीचा पाठपुरावा करताना राज्य शासन कृषि क्षेत्रात व्यापक आणि मूलभूत बदल घडवून आणत आहे. या परिवर्तनात महिला शेतकरी केंद्रस्थानी असणे ही काळाची आवश्यकता आहे. या अधिनियमामुळे महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून अधिकृत मान्यता मिळणार आहे. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा थेट लाभ, कर्ज सुविधा, पीक विमा, अनुदान, कौशल्यविकास प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल सुविधा, कृषि शिक्षण तसेच बाजारपेठेत अधिक सक्षम सहभागाची संधी त्यांना 2026 मध्ये उपलब्ध होईल,

महिला शेतकरी सक्षमीकरणाचा हा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्रातील कृषि क्षेत्र अधिक आधुनिक, सक्षम, स्पर्धात्मक आणि शाश्वत बनविण्यास निश्चितच मोलाची भूमिका बजावेल. राज्यातील प्रत्येक महिला शेतकरी आत्मविश्वासाने, स्वाभिमानाने आणि स्वावलंबनाने पुढे जावी, हीच सदिच्छा व्यक्त करतो आणि सर्व महिला शेतकरी भगिनींना उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

**—एकनाथ संभाजी शिंदे,**
उप मुख्यमंत्री

# शुभेच्छा



सत्यमेव जयते

महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि स्त्रीशक्तीचा गौरव करणारी भूमी आहे. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, मोगलमर्दिनी महाराणी ताराराणी या महान स्त्रीशक्तीच्या प्रेरणादायी वारशातूनच महाराष्ट्रातील महिला आज प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. कृषि क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच मोलाचे असून, 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026' हा त्या योगदानाला मिळालेला ऐतिहासिक सन्मान आहे.

शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे. बीज निवडण्यापासून ते उत्पादनाच्या विक्रीपर्यंत, पशुपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, कृषि प्रक्रिया, मूल्यवर्धन, सेंद्रिय शेती, जलसंधारण, मृदा संवर्धन, कुटुंबाचे आर्थिक नियोजन आणि कृषि व्यवस्थापन अशा प्रत्येक टप्प्यावर महिला मोठ्या जबाबदारीने कार्यरत असतात. त्यांच्या या अथक परिश्रमांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देणारा हा कायदा सामाजिक न्याय आणि कृषि विकासाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या कायद्यामुळे महिला शेतकऱ्यांना शासनाच्या कृषि योजनांचा थेट लाभ, पीक विमा, कर्ज सुविधा, अनुदाने, आधुनिक तंत्रज्ञान, कृषि शिक्षण, प्रशिक्षण, डिजिटल सेवा, बाजारपेठांमध्ये अधिक संधी आणि निर्णय प्रक्रियेत प्रभावी सहभाग मिळणार आहे. त्यामुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढेल, ग्रामीण कुटुंबे अधिक सक्षम होतील आणि राज्याच्या कृषि विकासाला नवी ऊर्जा प्राप्त होईल.

आज हवामान बदल, तंत्रज्ञान आणि जागतिक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर शेतीमध्ये मोठे परिवर्तन घडत आहे. नैसर्गिक व सेंद्रिय शेती, सूक्ष्म सिंचन, अचूक शेती, ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, कृषि प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या, निर्यातक्षम शेती आणि मूल्यवर्धन या नव्या संधींमध्ये महिला शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे. हा कायद त्या दिशेने टाकलेले दूरगामी आणि परिवर्तनकारी पाऊल आहे. महिला सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते, कुटुंब सक्षम झाले तर गाव सक्षम होते आणि गाव सक्षम झाले तर राज्याचा विकास अधिक वेगाने घडतो. त्यामुळे महिला शेतकऱ्यांना सन्मान, संधी आणि समान अधिकार देणारा हा कायदा महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचा भक्कम पाया ठरेल, असा मला विश्वास आहे. या विषयावर कृषि विभाग तयार करत असलेली माहिती पुस्तिका अत्यंत महत्त्वपूर्ण संदर्भमूल्य असणारा दस्तऐवज ठरेल. या माहिती पुस्तकेतून महिला शेतकऱ्यांचे अधिकार, शासनाच्या विविध योजना, आधुनिक कृषि परिवर्तन, तंत्रज्ञान आधारित शेती आणि भविष्यातील संधी यांचे सविस्तर दस्तऐवजीकरण होणार आहे. हा उपक्रम महिला सक्षमीकरणाच्या प्रवासाला अधिक बळ देणारा ठरेल. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने उचललेल्या या ऐतिहासिक पावलाबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते. तसेच राज्यातील सर्व महिला शेतकरी भगिनींना हार्दिक शुभेच्छा देत, त्या अधिक आत्मनिर्भर, तंत्रज्ञानस्नेही, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि महाराष्ट्राच्या कृषि परिवर्तनाच्या अग्रदूत बनोत, हीच सदिच्छा व्यक्त करते.

**—सुनेत्रा अजित पवार**
उप मुख्यमंत्री.

सत्यमेव जयते

# मनोगत



## महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी महाराष्ट्राचा ऐतिहासिक कायदा; देशासाठी आदर्श ठरेल

महाराष्ट्राने महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने देशात एक ऐतिहासिक आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल उचलत 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026' लागू केला आहे. महिला शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची स्वतंत्र ओळख, सन्मान आणि शासनाच्या सर्व कृषि योजनांचा समान व प्रभावी लाभ मिळवून देणारा हा कायदा केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास मला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी  अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026' राबविला जाणार आहे. शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. पेरणी, लागवड, निंदणी, काढणी, पशुपालन, कृषि प्रक्रिया, बीज संवर्धन तसेच शेतीपूरक उद्योगांमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असूनही त्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून आवश्यक ती अधिकृत मान्यता अनेक वर्षे मिळाली नव्हती. परिणामी कर्ज, पीक विमा, कृषि विस्तार सेवा, आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ, शासकीय अनुदाने आणि विविध कृषि योजनांचा लाभ घेताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. नव्या कायद्यामुळे ही तफावत दूर होऊन महिला शेतकऱ्यांना समान हक्क आणि संधी उपलब्ध होतील.

या कायद्यांतर्गत पात्र महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असून, त्याद्वारे त्यांना अधिकृत महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळेल. यामुळे शासनाच्या विविध कृषि योजना, कर्ज, विमा, अनुदाने, प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेतील संधी यांचा लाभ अधिक सुलभ आणि प्रभावीपणे मिळू शकेल. तसेच महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिजिटल नोंदणी व्यवस्था, जिल्हा व तालुका स्तरावर विशेष अधिकारी आणि राज्यस्तरीय समन्वय यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

हा कायदा तयार करताना महिला शेतकरी, स्वयंसेवी संस्था, कृषि विद्यापीठे, कृषि तज्ज्ञ, बँकिंग क्षेत्रातील प्रतिनिधी, कायदेतज्ज्ञ तसेच विविध शासकीय विभागांशी व्यापक सल्लामसलत करण्यात आली. प्राप्त झालेल्या सूचना आणि शिफारशींचा सखोल विचार करून हे सर्वसमावेशक आणि भविष्यवेधी विधेयक तयार करण्यात आले आहे .

"महिलांना केवळ शेतीतील श्रमिक म्हणून नव्हे, तर निर्णयक्षम, अधिकारसंपन्न आणि स्वतंत्र शेतकरी म्हणून मान्यता मिळणे ही काळाची गरज आहे. महिला शेतकऱ्यांचे आर्थिक, सामाजिक आणि कृषि क्षेत्रातील सर्वांगीण सक्षमीकरण हे राज्य शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून, 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026' हा त्या दिशेने उचललेला ऐतिहासिक आणि परिवर्तनकारी टप्पा आहे."

हवामान बदल, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि शाश्वत कृषि व्यवस्थेच्या उभारणीत महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या कायद्यामुळे महिला शेतकऱ्यांचा कृषि विकासातील सहभाग अधिक सक्षम होईल, त्यांचे आर्थिक स्वावलंबन आणि निर्णय प्रक्रियेतील योगदान वाढेल तसेच राज्यातील कृषि क्षेत्र अधिक समावेशक, न्याय्य, शाश्वत आणि सक्षम होण्यास निश्चितच चालना मिळेल.

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने महिला सक्षमीकरणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवत घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाला नवी दिशा देणारा ठरेल.

**—दत्तात्रय भरणे**
मंत्री (कृषि)

# संदेश

सत्यमेव जयते



## महिलांच्या सक्षमीकरणाला बळकटी मिळणार

"महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026" हा केवळ एक कायदा नसून ग्रामीण महिलांच्या कष्टांना, योगदानाला आणि अधिकारांना मिळालेली ऐतिहासिक मान्यता आहे. शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असूनही त्यांना अनेक वर्षे स्वतंत्र शेतकरी म्हणून आवश्यक ओळख मिळाली नव्हती. या कायद्यामुळे त्या अन्य शेतकऱ्यांप्रमाणे शासनाच्या विविध योजना, कर्ज, विमा, प्रशिक्षण, बाजारपेठ आणि इतर कृषि सुविधांचा लाभ अधिक प्रभावीपणे घेऊ शकतील.

मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक मैलाचा दगड ठरणार आहे. महिला शेतकऱ्यांचा आत्मविश्वास, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यास हा कायदा निश्चितच हातभार लावेल.

मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे नेतृत्व मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात "महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026" प्रभावीपणे राबविला जाणार आहे. राज्याच्या सर्व महिला शेतकरी भगिनींना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा. हा कायदा त्यांच्या प्रगतीचा, सन्मानाचा आणि समृद्धीचा नवा अध्याय ठरो, हीच सदिच्छा

**—ॲड. आशिष जयस्वाल**
राज्य मंत्री (कृषि)

# प्रस्तावना

“ या अधिनियमाची निर्मिती महिला शेतकऱ्यांच्या कष्टाची अधिकृत दखल घेण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी करण्यात आली आहे.

महाराष्ट्राच्या कृषि क्षेत्रामध्ये आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये महिला शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आणि पायाभूत आहे. पिकांच्या उत्पादनापासून ते काढणीपश्चात व्यवस्थापन, पशुपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन आणि वनोपज संकलन अशा विविध शेती व संलग्न क्षेत्रांमध्ये महिला अत्यंत समर्पित वृत्तीने कार्यरत आहेत. ग्रामीण भागातून पुरुषांचे बिगर-शेती क्षेत्राकडे वाढणारे स्थलांतर लक्षात घेता, सद्यस्थितीत शेतीची मुख्य धुरा महिलांच्या खांद्यावर आली आहे. मात्र, कुटुंबाची अन्नसुरक्षा आणि शेती व्यवसायासाठी आपले योगदान देत असतानाही, जमिनीच्या मालकी हक्काअभावी त्यांच्या कामाला गौण मानले गेले. परिणामी, प्रत्यक्ष शेती करत असूनही त्यांना अधिकृतपणे 'शेतकरी' म्हणून मान्यता मिळण्यात आणि शासकीय योजनांचा लाभ घेताना अनेक संरचनात्मक अडचणींचा सामना करावा लागत होता.

महिला शेतकऱ्यांची शेतीप्रती असलेली ही निष्ठा, त्यांचे कष्ट आणि त्यांचे हक्क यांना कायदेशीर संरक्षण व योग्य सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने हा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला आहे. संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाचे' औचित्य साधून महाराष्ट्र शासनाने या दिशेने ठोस धोरणात्मक पावले उचलली आहेत. 11 मार्च 2026 रोजी विधिमंडळात पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात महिला शेतकऱ्यांना त्यांची हक्काची स्वतंत्र कायदेशीर ओळख बहाल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता याच धोरणात्मक संकल्पाची अंमलबजावणी करत, महाराष्ट्र विधिमंडळाच्या 2026 मधील द्वितीय (पावसाळी) अधिवेशनामध्ये महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम 2026 एकमताने संमत करण्यात आला – आणि महिला शेतकरी व शेतमजूर महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

या अधिनियमाची निर्मिती महिला शेतकऱ्यांच्या कष्टाची अधिकृत दखल घेण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी करण्यात आली आहे. या कायद्याचे सर्वात मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात 'शेती' या संकल्पनेची व्याख्या अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक करण्यात आली आहे. त्यामुळे आता केवळ जमिनीची मालकी नसली तरी प्रत्यक्ष कृषि व संलग्न कामांच्या आधारावर महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' प्राप्त करण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला आहे. या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना संस्थात्मक बँक कर्ज, पीक विमा, शासकीय योजनांचे लाभ आणि बाजारपेठेतील सोयी-सुविधांचा लाभ घेणे अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहे.

प्रस्तुत माहितीपुस्तिका 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम 2026' मधील विविध कायदेशीर तरतुदी, महिलांचे अधिकार आणि प्रशासकीय प्रक्रिया यांची सोपी व अभ्यासपूर्ण माहिती सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी तयार करण्यात आलेली आहे. हा कायदा राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाच्या प्रवासात एक गतिमान आणि महत्त्वपूर्ण माध्यम ठरेल.

# अनुक्रमणिका

9 हा कायदा काय आहे?
10 हा कायदा का आणला?
11 या कायद्याचा उद्देश काय?
12 शेती म्हणजे नक्की काय?
13 महिला शेतकरी म्हणजे कोण?
14 महिला शेतकरी प्रमाणपत्र प्रक्रिया
15 ग्रामसभेची भूमिका
16 महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या आधारे उपलब्ध संधी
17 महिला शेतकरी सहाय्य अधिकारी
18 महत्त्वाची प्रश्नोत्तरे (FAQ)

# हा कायदा काय आहे?



***जमिनीचा सातबारा नव्हे, तर शेतीतील प्रत्यक्ष कष्ट — हा आता "महिला शेतकरी" या ओळखीचा निकष असेल.***

शेती व शेतीपूरक व्यवसायात प्रत्येक हंगामात — पेरणीपासून ते पीक हाती येईपर्यंत, गोठ्यातल्या कामापासून बाजारापर्यंत — महिलांची मेहनत असतेच. शेतीचं काम, जनावरांची निगा राखणे, मासेमारी, वनोपज संकलन करणे, आणि पीक काढल्यानंतरची कामं — या सगळ्यांत महिलांचा मोठा वाटा असतो.

पण अनेक महिलांच्या नावावर शेतजमीन नसते. त्यामुळे त्यांना "शेतकरी" म्हणून ओळखच मिळत नाही. आणि मग शासनाच्या योजना, कर्ज, अनुदान, विमा असे लाभही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत.

हा प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र विधिमंडळाने 7 जुलै 2026 रोजी "महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026" हा कायदा मंजूर केला. शेती आणि शेतीशी पूरक काम करणाऱ्या महिलांना कायदेशीर ओळख देणे, आणि त्यासाठी त्यांना "महिला शेतकरी प्रमाणपत्र" देणे — हाच या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.



# हा कायदा का आणला?



## म्हणून हा कायदा गरजेचा आहे

शेतात किंवा शेतीशी पूरक कामात प्रत्यक्ष राबणाऱ्या महिलेला – जमीन तिच्या नावावर असो वा नसो – स्वतःची, कायदेशीर "शेतकरी" ओळख मिळावी, हाच या कायद्याचा मूळ उद्देश आहे.

प्रत्येकाला जगण्यासाठी पुरेशी साधनं मिळावीत, आणि महिला-पुरुष दोघांनाही समान संधी मिळावी ही शासनाची जबाबदारी असते. पण सध्या शेतीच्या बहुतेक योजनांमध्ये "शेतकरी" कोण, हे ठरवताना जमीन कोणाच्या नावावर आहे, हेच पाहिलं जातं – किंवा कुटुंबातल्या पुरुषाचं नाव बघितलं जातं.

### खरी अडचण काय आहे?

- राज्यात खूप कमी महिलांच्या नावावर शेतजमीन आहे.
- घरची किंवा गावची सामायिक जमीन असेल, तर त्यावर राबणाऱ्या महिलेला "शेतकरी" म्हणून गृहित धरलं जात नाही – तिला "शेतमजूर" समजलं जातं.
- मासेमारी, जंगलातून वनोपज संकलन करणे, कुक्कुटपालन, जनावरं सांभाळणे – अशी कामं करणाऱ्या महिलांनाही "शेतकरी" म्हणून मान्यता मिळत नाही.
- यामुळे या महिलांना सरकारी योजना, बँक कर्ज, अनुदान, विमा आणि मार्गदर्शन यांचा फायदा घेता येत नाही.

### यामुळे आधीच्या योजना बंद होणार का?

नाही. हा कायदा कोणतीही जुनी योजना बंद करत नाही किंवा नवी वेगळी व्यवस्था तयार करत नाही. फक्त जमीन नावावर नाही म्हणून महिला योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी हा कायदा मदत करतो.

# या कायद्याचा उद्देश काय?





- शेती व शेतीशी पूरक काम करणाऱ्या महिलांना “महिला शेतकरी” म्हणून अधिकृत ओळख दिली जाईल.
- पात्र महिलांना “महिला शेतकरी प्रमाणपत्र” मिळेल.
- सरकारी योजना, कर्ज व अनुदान यांचा लाभ महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवला जाईल.
- राज्यातील सर्व महिला शेतकऱ्यांची नोंद ठेवली जाईल.
- महिला शेतकऱ्यांना मदत मिळावी, यासाठी निधी व यंत्रणा उभी केली जाईल.
- विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता व एकल महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध कार्यक्रम राबवले जातील.
- महिला शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण केले जाईल.

### पुढचं ध्येय काय?

महिलांना समान ओळख, संधी व मदत मिळावी; शेती अधिक समावेशक व्हावी; उत्पादन वाढावं; आणि ग्रामीण भागातील जीवन अधिक सुरक्षित व्हावं – हे या कायद्याचं मोठं उद्दिष्ट आहे.

### लक्षात ठेवा

हा कायदा जमीन सुधारणेशी किंवा जमीन मालकीशी संबंधित नाही. जमीन मालकी, वारसा किंवा मालमत्तेबाबतचे सध्याचे कायदे जसेच्या तसेच राहतील – यात कोणताही बदल होणार नाही.



# शेती च्या व्याख्येची व्यापकता

पूर्वी “शेती” म्हणजे फक्त शेतात पीक घेणं, एवढाच अर्थ घेतला जायचा. पण या कायद्यात “शेती” या शब्दाचा अर्थ व्यापक केला आहे – त्यात पुढील सर्व कामांचा समावेश होतो:

**पीक व फळबाग**
पिकांची लागवड, बियाणे तयार करणे, फळबाग व फुलशेती, मशरूम लागवड





**जनावरं व दूध**
जनावरांची निगा राखणे, दूध व्यवसाय, कोंबडीपालन, मधमाशीपालन, जनावरांसाठी चारा पिकवणे



## शेती म्हणजे नक्की काय?



**मासे**
मासेमारी, मत्स्यशेती





**रेशीम व खत**
रेशीम उत्पादन; गांडूळ खत व सेंद्रिय खत तयार करणे

**वनोपज व प्रक्रिया**
जंगलातून वनोपज संकलन करून विकणे; शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया व मूल्यवर्धन

**कोणत्याही पद्धतीने केलेली शेती** – भाड्याने, कराराने, वाट्याने किंवा स्थलांतर करून केलेली शेती

# महिला शेतकरी म्हणजे कोण?

तुमचं वय 18 वर्षांपेक्षा जास्त आहे आणि तुम्ही शेतीचं किंवा शेतीशी पूरक कुठलंही काम करता — मग जमीन तुमच्या नावावर असो वा नसो — तर तुम्ही "महिला शेतकरी" आहात.

**खालीलपैकी कोणताही एक निकष तुम्हाला लागू होतो का?**

- तुम्ही स्वतःची शेतजमीन कसता
- तुम्ही दुसऱ्याची जमीन तोंडी अथवा लेखी करार करून भाड्याने घेऊन शेती करता
- तुम्ही वर्षातील किमान एका हंगामात महाराष्ट्र राज्यात शेती करता आणि त्यानंतर कोणत्याही कारणासाठी दुसऱ्या गावी किंवा राज्याबाहेर स्थलांतर करता;
- तुम्ही शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया करता किंवा त्याचे मूल्यवर्धन करता (म्हणजे कच्चा माल वापरण्यायोग्य किंवा विकण्यायोग्य तयार करता).
- तुम्ही बियाण्यांच्या, जनावरांच्या किंवा माशांच्या जाती जपता किंवा वाढवता, किंवा बदलत्या हवामानाला अनुकूल अशा पद्धतीने शेती करता;
- तुमची स्वतःची जमीन नाही, पण तुम्ही शेतमजुरी करता, जनावरांची निगा राखता, रोपवाटिकेत काम करता;

# महिला शेतकरी प्रमाणपत्र कसे मिळेल?

**टप्पा 1**

### अर्ज करा

ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत हद्दीत राहणारी आणि शेती किंवा शेतीशी पूरक काम करणारी कोणतीही महिला ऑनलाईन अर्ज करू शकते

**टप्पा 2**

### अर्ज ग्रामसभा/ नगरपंचायतीसमोर जाईल

हा अर्ज पुढच्या ग्रामसभेच्या किंवा नगरपंचायतीच्या विशेष अथवा सर्वसाधारण बैठकीत मांडला जाईल.

**टप्पा 3**

### ठराव करण्यात येईल.

अर्ज करणारी महिला अधिनियमातील शेतीच्या व्याख्येनुसार शेती किंवा शेतीपूरक काम करते का, हे ग्रामसभा/ नगरपंचयातीद्वारे खातरजमा करून अर्ज मंजूर करायचा की नाकारायचा, याचा ठराव मंजूर करेल.

**टप्पा 4**

### प्रमाणपत्र मिळेल

ठराव मंजूर झाल्यापासून 15 दिवसांत महिला शेतकरी प्रमाणपत्र दिलं जाईल.

**टप्पा 5**

### अर्ज नाकारला तर

नाकारल्याचं कारण 7 दिवसांत लेखी कळवलं जाईल.

**टप्पा 6**

### अपील

निर्णयावर किंवा झालेल्या उशिरावर हरकत असल्यास, महिला 120 दिवसांच्या आत अपिलीय अधिकाऱ्याकडे दाद मागू शकते. अपिलीय अधिकारी 30 दिवसांत निर्णय देईल. या मुदतीत दाद मागता आली नाही, आणि त्यामागे योग्य कारण असेल, तर मुदत उलटूनही दाद मागितली जाऊ शकते.

## अर्ज न करताही मान्यता शक्य

**पात्र महिलेने स्वतः अर्ज केला नसला, तरीही ग्रामसभा स्वतःहून तिला महिला शेतकरी म्हणून मान्यता देऊ शकेल व महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याचे निर्देश देऊ शकेल.**

# ग्रामसभेची भूमिका



### ग्रामसभा नेमकं काय करते?

- अर्ज केलेली महिला शेती किंवा शेतीपूरक काम करते का, याची खात्री करते.
- त्या आधारे तिच्या अर्जाला मान्यता द्यायची की अर्ज नाकारायचा, याचा ठराव मंजूर करते.
- एखादी पात्र महिला असूनही तिने अर्ज केला नसेल, तरी ग्रामसभा स्वतःहून तिला मान्यता देऊ शकते.

### ही जबाबदारी फक्त शासनाची नाही

हा कायदा नीट राबवला जाण्यासाठी गावातले लोक, ग्रामसभा आणि शासकीय यंत्रणा – तिघांनीही एकत्र काम करणं गरजेचं आहे.

## माझी जबाबदारी

- ग्रामसभेच्या बैठकांना आवर्जून जा
- पात्र महिला शेतकऱ्यांना ओळखायला मदत करा
- या कायद्याबद्दल गावात माहितीचा प्रचार करा




कृपया नोंद घ्यावी की, उपरोक्त चित्र हे प्रमाणपत्राचे एक प्रतीकात्मक स्वरूप आहे.

# महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे उपलब्ध लाभाच्या संधी

महिला शेतकरी प्रमाणपत्र म्हणजे तुम्ही “शेतकरी” आहात, याचा अधिकृत पुरावा. या प्रमाणपत्राच्या आधारे, संबंधित योजनेच्या अटी, शर्ती आणि विहित पात्रता निकषांच्या अधीन राहून, हे प्रमाणपत्र धारक खालील घटकांशी संबंधित शासकीय योजनांमध्ये अर्ज सादर करण्यास पात्र ठरू शकतात :



- शेतीसाठी आर्थिक मदत व अनुदानासंबंधी योजनांसाठी




- बियाणे, खते व इतर शेती-साहित्य पुरवणाऱ्या योजनांसाठी



- शेतीविषयक कर्ज, पीक विमा व मार्गदर्शन सेवांसाठी



- शेतमाल बाजारापर्यंत नेण्यासाठी वाहतूक, साठवणूक व खरेदी-विक्रीशी संबंधित सुविधांसाठी




- **कौशल्य शिकवणाऱ्या व स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास मदत करणाऱ्या कार्यक्रमांसाठी**



- **विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता व आर्थिक/सामाजिकदृष्ट्या दुर्बल एकल महिला शेतकऱ्यांसाठीच्या मदत कार्यक्रमांसाठी**




- **राज्य शासनाच्या कर्ज-धोरणांशी संबंधित सुविधांसाठी**

# महिला शेतकरी सहाय्य अधिकारी




महिला शेतकऱ्यांना थेट मदत मिळावी, यासाठी तालुका पातळीवर आणि जिल्हा पातळीवर "महिला शेतकरी सहाय्य अधिकारी" नेमले जातील. हे अधिकारी तुमच्यासाठी सगळ्यात जवळचा आणि थेट संपर्काचा माणूस असतील.

## महिला शेतकरी सहाय्य अधिकारी तुम्हाला कशी मदत करतील?

- अर्जापासून प्रमाणपत्र मिळेपर्यंत — संपूर्ण प्रक्रियेत मदत करतील.
- ग्रामसभा व नगरपंचायतीलाही महिलांना मान्यता देण्याच्या कामात मदत करतील.
- या कायद्यानुसार तुम्हाला मिळू शकणाऱ्या हक्कांची माहिती देतील.
- नवीन शेती-तंत्रज्ञान, प्रशिक्षण व मार्गदर्शन महिलांपर्यंत पोहोचवण्यास मदत करतील.

## कोणाशी संपर्क साधावा?

अर्ज करताना अडचण आली, प्रमाणपत्राबाबत शंका असेल, किंवा तुमच्या हक्कांबद्दल माहिती हवी असेल — तर तुमच्या तालुक्यातील किंवा जिल्ह्यातील महिला शेतकरी सहाय्य अधिकाऱ्याशी थेट संपर्क साधता येईल.

# महत्वाची प्रश्नोत्तरे



**प्र. 1.** महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम म्हणजे काय?

उ. **शेती व शेतीशी निगडित काम करणाऱ्या महिलांना "महिला शेतकरी" म्हणून कायदेशीर ओळख देण्यासाठी हा कायदा आणला आहे. पात्र महिलांना या कायद्याद्वारे प्रमाणपत्र दिले जाईल .**

**प्र. 2.** हा कायदा का गरजेचा आहे?

उ. **अनेक महिला शेतीत प्रत्यक्ष काम करतात, पण त्यांच्या नावावर जमीन नसल्यामुळे त्यांना "शेतकरी" म्हणून मान्यता मिळत नाही. त्यामुळे शेतीच्या योजना, कर्ज, विमा आणि इतर मदतीपासून त्या वंचित राहतात.**

**प्र. 3.** महिला शेतकरी कोणाला म्हणता येईल?

उ. **वय वर्ष 18 पेक्षा जास्त असलेली आणि शेती किंवा शेतीशी निगडित कामात**



# महत्वाची प्रश्नोत्तरे

**प्रत्यक्ष सहभागी असलेली कोणतीही महिला — जमीन तिच्या नावावर असो वा नसो — महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळवण्यास पात्र आहे.**

**प्र. 4.** महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळण्यासाठी जमीन स्वतःच्या नावावर असणं गरजेचं आहे का?

उ. **नाही. जमीन कोणाच्या नावावर आहे, हे महत्त्वाचं नाही — तुम्ही प्रत्यक्ष करत असलेलं काम हाच या कायद्यातला सर्वांत मोठा निकष आहे.**

***

**प्र. 5.** शेतीमध्ये कोणकोणत्या कामांचा समावेश होतो?

उ. **पिकांची लागवड व बियाणे तयार करणे; जनावरं सांभाळणे, कोंबडीपालन व दूध व्यवसाय; मधमाशीपालन; जनावरांसाठी चारा पिकवणे; मासेमारी व मत्स्यशेती; रेशीम उत्पादन; फळबाग, फुलशेती व मशरूम लागवड; गांडूळ खत व सेंद्रिय खत तयार करणे; गुरं चरण्यासाठी किंवा खतासाठी जमिनीचा वापर; भाड्याने, वाट्याने किंवा स्थलांतर करून केलेली शेती; जंगलातून वनोपज संकलन करून विकणे; तसेच शेतमालावरील प्राथमिक प्रक्रिया व मूल्यवर्धन — या सर्वांचा यात समावेश होतो.**







# महत्वाची प्रश्नोत्तरे

***

**प्र. 6.** महिला शेतकरी प्रमाणपत्र कसं मिळेल?

**उ.** **पात्र महिला ऑनलाईन अर्ज करेल. ग्रामसभा किंवा नगर पंचायत सभा पडताळणी करून ठराव मंजूर करेल. त्यानंतर ठरलेल्या मुदतीत महिला शेतकरी प्रमाणपत्र दिलं जाईल.**

***

**प्र. 7.** अर्ज नाकारला, तर काय करता येईल?

**उ.** **अर्ज का नाकारला, हे कारण लेखी स्वरूपात कळवलं जाईल. त्यानंतर ठरलेल्या मुदतीत अपिलीय अधिकाऱ्याकडे दाद मागण्याची सोयही या कायद्यात आहे.**

***

**प्र. 8.** मासेमारी किंवा मत्स्यशेती करणाऱ्या महिलांनाही महिला शेतकरीम्हणून मान्यता मिळू शकते का?

**उ.** **होय. मासेमारी व मत्स्यशेती सुद्धा या कायद्यातील "शेती"च्या व्याख्येत येतात. त्यामुळे मत्स्यव्यवसायात काम करणाऱ्या महिलांनाही "महिला शेतकरी" म्हणून मान्यता मिळू शकते.**

***

**प्र. 9.** वर्षातून एकाच हंगामात काम करणारी महिलाही पात्र ठरते का, की वर्षभर काम आवश्यक आहे?





# महत्वाची प्रश्नोत्तरे

**उ. होय, ती पात्र ठरते. वर्षातील किमान एका हंगामात महाराष्ट्रात शेती करणाऱ्या महिलादेखील "महिला शेतकरी" या व्याख्येत येतात.**

***

**प्र. 10.** "एकल महिला" म्हणजे नेमक्या कोणत्या महिलांचा समावेश होतो?

**उ. विधवा, पती बेपत्ता असलेली, परित्यक्ता, घटस्फोटित किंवा अविवाहित अशा अठरा वर्षांवरील महिलांचा यात समावेश होतो. अशा महिलांसाठी मदत कार्यक्रम राबवण्याची तरतूद या कायद्यात आहे.**

***

**प्र. 11.** महिलेने स्वतः अर्ज केला नाही, तर तिला मान्यता मिळूच शकत नाही का?

**उ. नाही. एखादी महिला शेती किंवा शेतीशी निगडित कामात असूनही तिने अर्ज केला नसेल, तरी ग्रामसभा स्वतःहून तिला महिला शेतकरी म्हणून मान्यता देऊ शकते.**

***

**प्र. 12.** ग्रामसभा किंवा नगरपंचायतीचा निर्णय अन्यायकारक वाटल्यास महिलेकडे कोणता पर्याय आहे?

**उ. अशा निर्णयाविरुद्ध अपिलीय अधिकाऱ्याकडे दाद मागण्याचा अधिकार या कायद्याने अर्ज करणाऱ्या महिलेला दिला आहे.**

**प्र. 13.** अर्ज मंजूर झाल्यावर प्रमाणपत्र मिळण्यास किती वेळ लागतो?

**उ. ठराव मंजूर झाल्यापासून 15 दिवसांच्या आत महिला शेतकरी प्रमाणपत्र दिलं जाईल.**

***

**प्र. 14.** अर्ज नाकारल्यास किंवा ठरलेल्या वेळेत प्रमाणपत्र न मिळाल्यास काय करता येतं?

**उ. अशा वेळी 120 दिवसांच्या आत अपिलीय अधिकाऱ्याकडे दाद मागता येते; अपिलीय अधिकारी 30**



# महत्वाची प्रश्नोत्तरे



दिवसांत निर्णय देईल.**

***

**प्र. 15.** 120 दिवसांत दाद मागता आली नाही, तर संधी पूर्णपणे संपते का?

**उ.** **नाही. उशीर होण्यामागे योग्य कारण असल्याची खात्री पटल्यास, अपिलीय अधिकारी मुदतीनंतरही दाद स्वीकारू शकतो.**

***

**प्र. 16.** या प्रमाणपत्रामुळे सर्व शासकीय कृषि योजनांचा आपोआप लाभ मिळतो का?

**उ.** **नाही. हे प्रमाणपत्र म्हणजे तुम्ही महिला शेतकरी असल्याचा अधिकृत पुरावा आहे; प्रत्यक्ष लाभ मात्र त्या-त्या योजनेच्या स्वतंत्र अटींनुसारच मिळतो.**

***

**प्र. 17.** या कायद्यामुळे पुरुष शेतकऱ्यांचे हक्क किंवा योजनांतले लाभ कमी होतील का?

**उ.** **नाही. पुरुष शेतकऱ्यांचे सध्याचे हक्क, लाभ व पात्रता जशीच्या तशी राहते; हा कायदा फक्त महिलांना अधिकृत ओळख मिळवून देण्यासाठी आहे.**

**प्र. 18.** हा कायदा आधीचे शेतीविषयक कायदे व योजना बदलतो का?

**उ.** **नाही. हा कायदा इतर सध्याच्या कायद्यांना पूरक आहे — तो त्यांची**

**जागा घेत नाही किंवा त्यांना कमकुवतही करत नाही.**

***

**प्र. 19.** ग्रामसभेने अर्ज नाकारला, तर त्याचं कारण किती दिवसांत कळेल?

**उ.** **ठराव मंजूर झाल्यापासून 7 दिवसांच्या आत अर्ज का नाकारला आणि दाद कशी मागायची, ही माहिती लेखी स्वरूपात कळवली जाईल.**

***

**प्र. 20.** ठरलेल्या वेळेत काहीच कळवलं नसेल, तर अर्जदार महिलेला दाद मागण्यासाठी 120 दिवस थांबावं लागतं का?

**उ.** **नाही. 120 दिवस ही दाद मागण्यासाठीची कमाल मुदत आहे. 15 दिवसांत प्रमाणपत्र न मिळाल्यास, ती मुदत संपताच महिला लगेच दाद मागू शकते — त्यासाठी 120 दिवस पूर्ण होण्याची वाट पाहायची गरज नाही.**

**प्र. 21.** . अपिलीय अधिकाऱ्याने अपील अर्जावर निर्णय किती दिवसांत द्यावा?

**उ.** **अपील-अर्ज दाखल झाल्यापासून 30 दिवसांच्या आत अपिलीय अधिकाऱ्याने निर्णय देणं बंधनकारक आहे.**

***

**प्र. 22.** महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे शेतजमीन खरेदी करण्याची पात्रता मिळते का?

**उ.** **नाही. महाराष्ट्रात शेतजमीन खरेदीसाठी वेगळे कायदे आहेत, ज्यानुसार जमीन खरेदीचे सध्याचे नियम जसेच्या तसेच लागू राहतात.**

टीप: सदर सर्व प्रतिमा AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) द्वारे तयार करण्यात आल्या आहेत.

कृषि विभाग, महाराष्ट्र शासन

आणि

एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन (MSSRF)

यांच्या संयुक्त विद्यमाने

# महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६



माहिती पुस्तिका